# ॥ज्योतिर्मय॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १६३ वा ❑ बुधवार दि.१३ ऑगस्ट २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


विशेष लेख...

## मुनीर यांची अनुयुद्धाची वल्गना

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल असीम मुनीर हे स्वतःला फील्ड मार्शल घोषित केल्यानंतर दोन महिन्यांत दुसऱ्यांदा अमेरिकेच्या दौरा केला.फ्लोरिडा येथून मुनीर यांनी भारताला अणुहल्ल्याची धमकीही दिली. पाकिस्तानी जनरलचे हे विधान जितके आक्रमक आहे तितकेच ते हताशही आहे. टाम्पा येथील ग्रँड हयात हॉटेलमध्ये पाकिस्तानी व्यापारी अदनान असद यांच्यासोबतच्या जेवणात त्यांनी म्हटले की जर भारतासोबतच्या युद्धात पाकिस्तानचे अस्तित्व धोक्यात आले तर ते अर्धे जग सोबत घेऊन जातील.विशेष ऑपरेशन सिंदूर दरम्यान सपाटून मार खाल्यानंतर मुनीरने अणुहल्ल्याची धमकी दिली. इतके बळ मुनीरला आले कुठून ? मुनीरच्या पाठीशी कोण आहे? अर्थातच मुनीरच्या पाठीशी अमेरिकेचे बळ असून मुनीर अमेरिकन भूमीवरून भारताला धमकी देतो..आणि अमेरिका मुंग गिळून चुप्प आहे.एकीकडे ट्रम्प यांनी मध्यस्थी केल्याच्या वल्गना करत आहे...तर दुसरीकडे पाकिस्तानसोबत सलगी करत आहे. टॅरिफ धोरणामुळे भारत आणि अमेरिकेतील संबंध अत्यंत तणावपूर्ण असताना, ट्रम्प प्रशासन पाकिस्तानी लष्करप्रमुखांसाठी लाल कार्पेट अंथरत आहे.

भारताला अनुयुद्धाची धमकी देत असतानाच जनरल मुनीर यांनी भारताने बांधलेले धरण १० मिनिटांत उद्ध्वस्त करण्याची धमकी दिली आहे.ते म्हणाले की सिंधू नदी ही भारतीयांची कुटुंबाची मालमत्ता नाही. भारत धरण बांधेल तेव्हा आम्ही ते उद्ध्वस्त करू. या अहवालांचा पाकिस्तानने अधिकृतपणे निषेध केलेला नाही.भारतातील काही तज्ञांचा असा विश्वास आहे की डोनाल्ड ट्रम्प ज्या पद्धतीने जवळजवळ दररोज दावा करत आहेत की त्यांनी भारत आणि पाकिस्तानमधील संभाव्य अणुयुद्ध थांबवले आहे, त्यामुळे पाकिस्तानी लष्करप्रमुखांना असे बेजबाबदार विधान करण्यास प्रोत्साहित केले असावे.

पाकिस्तानचे लष्करप्रमुख असीम मुनीर यांनी अमेरिकेच्या भूमीवरून दिलेल्या अणुहल्ल्याची धमकी भारत सरकारने तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. भारताने केवळ पाकिस्तानलाच नव्हे तर अमेरिकेलाही आरसा दाखवण्याचा प्रयत्न केला आहे.

अशा तिसऱ्या मित्र देशाच्या मातीतून असे विधान केले जाणे हे देखील खेदजनक आहे. अणुहल्ल्याच्या कोणत्याही प्रकारच्या ब्लॅकमेलिंगसमोर भारत झुकणार नसल्याचे विदेश मंत्रालयाने स्पष्ट केले. आम्ही आमच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी सर्व शक्य पावले उचलत राहू,असे भारताने ठणकावून सांगितले

परराष्ट्र मंत्रालयाने असीम मुनीर यांच्या धमकीवर एक निवेदन जारी केले आणि म्हटले आहे की पाकिस्तानच्या लष्करप्रमुखांनी त्यांच्या अमेरिका दौऱ्यादरम्यान दिलेल्या विधानाने आमचे लक्ष वेधले. अणुहल्ल्याची धमकी देणे ही पाकिस्तानची जुनी सवय आहे. पाकिस्तानच्या अशा बेजबाबदार विधानांकडे लक्ष देऊन आंतरराष्ट्रीय समुदाय निष्कर्ष काढू शकतो. पाकिस्तान हा केवळ प्रादेशिक सुरक्षेसाठीच नाही तर जागतिक सुरक्षेसाठीही धोका आहे.

ऑपरेशन सिंदूरनंतर, संरक्षण मंत्री आणि लष्करप्रमुख असीम मुनीर यांच्यासह पाकिस्तानमधील अनेक व्यक्तींनी अणुहल्ल्याची धमकी दिली आहे हे लक्षात घेण्यासारखे आहे. सिंधू पाणी करार रद्द झाल्यामुळे पाकिस्तान संतापला आहे. जगातील विविध व्यासपीठांवर त्यांनी सतत अयशस्वी प्रयत्न केले आहेत, परंतु त्यांना कुठेही पाठिंबा मिळालेला नाही. पहलगाम हल्ल्यात त्यांचा सहभाग देखील समोर आला आहे.


### आकर्षक बक्षिस योजना

वास्तुशास्त्र पेंटींग या अनोख्या विषयावरील "लघु लेखमाला" एका सप्ताहातच वाचकप्रिय होऊ लागली आहे.या लघुलेख मालेचे लेखक,हे जगप्रसिद्ध वास्तुशास्त्र आणि रंग शास्त्र तज्ज्ञ आहेत. त्यांना अनेक जिज्ञासू वाचकांचे फोन होताहेत. अशा वेळी, जेव्हा क्रमशः लेख क्रम राहून जातो.या लेखमालेतील प्रत्येक लेख हा कुठल्यातरी बाबीचा संदर्भ असु शकतो.म्हणून एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान आणि ज्योतिर्मय यांच्या संयुक्त विद्यमाने आम्ही एक योजना आणली आहे. "वास्तुशास्त्र पेंटींग या लघुलेख मालेचे क्रमवार लेख दर महिन्याला जमा करून जो किंवा जे वाचक, ज्योतिर्मय च्या कार्यालयाकडे पाठवतील त्यापैकी भाग्यवान क्रमांकांना एस्.व्ही.एस्.कला प्रतिष्ठान कडून आकर्षक पारितोषिक प्रदान करण्यात येईल.


# पहिलीपासून त्रिभाषा सूत्राचा घाट ही मराठीच्या अस्तित्वासाठी धोक्याची घंटा-डॉ.सुधीर रसाळ

## मुक्त सृजन संस्थेकडून जीवनगौरव पुरस्कार प्रदान

ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर –** मराठीने हिंदीसोबत कधीच दुजाभाव केला नाही. मराठी संतांनी अनेक हिंदी रचना केल्या आहेत. मात्र, आता इयत्ता पहिलीपासून त्रिभाषा सूत्राचा घाट घातला जात आहे, हे अत्यंत भयंकर आहे. कारण त्रिभाषा सूत्राने मराठी संस्कृती आणि मराठीचे अस्तित्व धोक्यात येणार असल्याची भीती ख्यातनाम समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांनी सोमवारी, ११ रोजी येथे व्यक्त केली. मुक्त सृजन संस्थेच्या वतीने जीवनगौरव पुरस्कार स्वीकारल्यानंतर सत्काराला उत्तर देतान डॉ. रसाळ बोलत होते. सन्मानपत्र, पोषाख आणि रोख ११ हजार रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमीच्या सभागृहातील सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी प्रा. प्रभाकर बागल, तर प्रमुख पाहुणे म्हणून नॅशनल बुक ट्रस्टचे अध्यक्ष प्रा. डॉ. मिलिंद मराठे, लोकसाहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे, विश्वकोष निर्मिती मंडळाचे माजी अध्यक्ष प्रा. राजा दीक्षित, सत्कारमूर्ती डॉ. सुधीर रसाळ, सुमती रसाळ, संस्थेचे अध्यक्ष महेश खरात यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. रसाळ म्हणाले, नेहरूंनी स्थापन केलेल्या नॅशनल बुक ट्रस्टच्या अध्यक्षांच्या हस्ते सत्कार होत असल्याचा आनंद आहे. मराठी साहित्यकृती सर्व भाषांत प्रसिद्ध होण्यासाठी या संस्थेने कार्य विकसित केले पाहिजे. मुक्त सृजन ही संस्था स्वखर्चातून काम करत आहे. सरकारचे अनुदान घेणाऱ्या संस्था मिंधेपणामुळे सरकारविरुद्ध बोलत नाहीत. त्यामुळे सांस्कृतिक संस्था अनुदान न घेता चालवल्या पाहिजेत असे ते म्हणाले.



मराठीचे नुकसान महाराष्ट्र प्रांत भाषेच्या बाबतीत भयंकर उदासीन आहे. त्यामुळे राज्यात त्रिभाषा सूत्र लादून सांस्कृतिक परंपराच नष्ट करण्याचा घाट घातला जात आहे. हिंदी, मराठी आणि इंग्रजीच्या मराठी भाषेत शब्द बनवण्याची प्रक्रियाच नष्ट झाली आहे. कारण मराठी शब्दाचे स्पष्टीकरण आम्ही इंग्रजीत अथवा हिंदीत देतो. त्यामुळे मराठीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. राज्यात त्रिभाषा सूत्र लागू करणे म्हणजे तुम्हाला मराठीचे अस्तित्व नको आहे. या सूत्रामुळे लहान मुलांमध्ये संभ्रम निर्माण होईल. या तिन्ही भाषा एकमेकीत घुसून मराठी भाषा निर्माण होईल. असे जर होत राहिले तर पन्नास वर्षांनंतर ज्ञानेश्वर, तुकाराम कोण होते, हे शाधावे लागेल, असे रसाळ म्हणाले.

प्रास्ताविकात डॉ. महेश खरात यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली. लोक अंगाची जेष्ठ अभ्यासक आणि संशोधक डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी डॉ. रसाळांना शुभेच्छा दिल्या. प्रा. राजा दीक्षित यांनी रसाळांच्या साहित्यावर मार्मिक भाष्य केले. प्रा. डॉ. मिलिंद मराठे यांनी डॉ. रसाळ यांच्या लिखानाचे कौतुक केले. अध्यक्षीय समारोपात प्रा. प्रभाकर बागल यांनी वाचन आणि चिंतनातून आकारास आलेले रसाळांचे साहित्य पुढील पिढ्यांसाठी अनमोल ठेवा असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन डॉ. संतोष देशमुख यांनी केले. कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### तात्या, बापू, नाना..

लोकसाहित्याचे गाढे अभ्यास व संशोधक डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी आपल्या भाषणात छत्रपती संभाजीनगरातील साहित्य विश्वात असणाऱ्या तात्या, बापू, नाना यांच्या मैत्रीविषयी असणारे अनेक किस्से आपण ऐकल्याचे यावेळी विशद केले. गो. मा. पवार यांना तात्या, डॉ. सुधीर रसाळ यांना बापू तर न्या. नरेंद्र चपळगावकर यांना नाना म्हणत असत. या तिघांची मैत्री शेवटपर्यंत कायम होती. त्यांनी मराठी लेखनात मापदंड निर्माण केले. त्याचबरोबर नवलेखकांनाही प्रोत्साहन दिले, असे मत डॉ. शिंदे यांनी व्यक्त केले.

# कमलनयन बजाज हॉस्पिटलमध्ये पॅन्क्रियाज ट्रान्सप्लांटवर विशेष कार्यक्रम



ज्योतिर्मय साहित्य

**छत्रपती संभाजीनगर –** छत्रपती संभाजीनगरमधील कमलनयन बजाज हॉस्पिटल हे पॅन्क्रियाज ट्रान्सप्लांटसाठी अधिकृत परवाना मिळवणारे मराठवाड्यातील पहिले रुग्णालय ठरले आहे. या ऐतिहासिक महत्वाच्या टप्प्याचे औचित्य साधून एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी पॅन्क्रियाज ट्रान्सप्लांटविषयी शास्त्रीय, वैद्यकीय आणि नैतिक बाजूंवर सखोल चर्चा होणार असून, तज्ज्ञ डॉक्टर आपले अनुभव आणि दृष्टिकोन मांडणार आहेत. ज्येष्ठ उद्योजक तथा सीएमआयए चे अध्यक्ष श्री. उत्सव माछर कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे असून घाटी रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे, एमजीएम रुग्णालयाचे सीईओ डॉ. प्रवीण सूर्यवंशी, आयएमए चे अध्यक्ष डॉ. अनुपम टाकळकर आणि आयएमए चे सचिव डॉ. योगेश लक्कस हे विशेष अतिथी आहेत.

प्रमुख वक्ते म्हणून डॉ. अनुराग श्रीमल, प्रख्यात मल्टीऑर्गन ट्रान्सप्लांट सर्जन मुंबई, डॉ. जॉर्ज नोएल फर्नांडिस, मुख्य कार्यकारी अधिकारी, कमलनयन बजाज हॉस्पिटल छत्रपती संभाजीनगर, डॉ. अजय वसंत रोट्टे, वैद्यकीय संचालक, डॉ. मिलिंद वैष्णव, ट्रान्सप्लांट विभाग प्रमुख, डॉ. अर्चना सारडा, वरिष्ठ मधुमेह तज्ज्ञ व उडान एनजीओच्या संस्थापक

मुख्य विषय : पॅन्क्रियाज ट्रान्सप्लांट प्रक्रियेविषयी सखोल माहिती, टाइप १ डायबेटीस व इतर गंभीर मधुमेह रुग्णांसाठी नव्या आशा, वैद्यकीय क्षेत्रातील नव्या संधी व उपचारपद्धती हे होते.

यावेळी प्रख्यात मल्टीऑर्गन ट्रान्सप्लांट सर्जन डॉ. अनुराग श्रीमाल पॅन्क्रियाज यांनी ट्रान्सप्लांट विषयी सखोल माहिती दिली. तसेच डॉ. शिवाजी तौर, डॉ. गौरव रत्नपारखी, डॉ. अनिरुद्ध गोपनपल्लीकर आणि डॉ. अर्चना सारडा यांचे पॅनल डिस्कशन झाले ते सर्वांच्या वैद्यकीय ज्ञानात भर घालणारे होते. याशिवाय तज्ज्ञांशी थेट संवाद व प्रश्नोत्तर सत्र झाले त्यात पत्रकारांच्या याविषयीच्या शंकाचे समाधान करण्यात आले. त्यानंतर हाय टी आणि मीडियाशी संवाद आयोजित करण्यात आला.

कमलनयन बजाज रुग्णालयाचे सीईओ डॉ. जॉर्ज फर्नांडीस यांच्या अथक प्रयत्नातून अनेक जीव वाचवणारे पॅन्क्रियाज प्रत्यारोपण हे त्यांच्या दूरदृष्टीने आणि मानवतेच्या भावनेने आखलेल्या उद्दिष्टांची पूर्ती दर्शवते. आपल्या माध्यमातून या वैद्यकीय प्रगतीची माहिती जनतेपर्यंत पोहोचेल, ही अपेक्षा आहे.

## वास्तुशास्त्र पेंटींग

### लघुलेख - 16



'वास्तुशास्त्र पेंटींग' हे व्यक्तीच्या आणि वास्तुच्या जन्मकुंडली नुसार बनवले जाते. त्या त्या जन्मकुंडली मधील 'राशी' आणि 'नक्षत्र' यांचा विशेष अभ्यास करुन, 'पेंटींग' मधील घटकांची निवड केली जाते.

आजच्या लघुलेखा पासून आपण एकेक राशी आणि तिच्याशी संबंधित नक्षत्रांची माहिती घेणार आहोत.

राशीचक्रातील पहिली राशी ही 'मेष' आहे. ही राशी 'अग्नी' तत्वाची असून 'मेंढा', हे या राशीचे चिन्ह आहे' 'अग्नी 'तत्व हे, रंगशास्त्रातील विशेषतः रंगचक्रातील 'उष्ण' रंगसंगतीशी निगडीत आहे. लाल, नारिंगी, 'क्रोम यलो' म्हणने पिवळ्या रंगाची गडद स्थिती... हे रंग प्रभावाने सदर वास्तुशास्त्र पेंटींग' रंगवले जाते. अश्विनी, भरणी आणि कांही प्रमाणात कृत्तिका नक्षत्रावर जन्म झालेल्या व्यक्तीची 'मेष' राशी असते.

नक्षत्र या प्रत्येक नक्षेत्राचा एक आराध्य वृदत असतो. तसेच प्रत्येक हे विशिष्ट देवतांच्या अधिपत्याखाली येत. जसे की, की अश्विनी नक्षत्राची, नक्षत्र देवता, ही 'आश्विनीकुमार आहे. भरणी ची 'यम' आणि कृतिका ची 'अग्नी या देवता आहेत. या प्रत्येक तपशीलासह, मेष राशिचा राशिस्वामी 'मंगळ' आहे. या व आणखी कांही गोपनीय बाबींचा, सदर पेंटींग मधील घटकांमध्ये अंतर्भाव होतो.

पुढे ज्या चरणांत जन्म झालेला असेल त्या चरणाची आद्याक्षरे,नक्षत्र पीड़ा हर मंत्र, या मधील अक्षरे,त्यांची आशय गर्भ वळणे इ.चा विचार त्या पेंटींग मधील आकर्षकतेचा भाग वाढावा, म्टणून केला जातो; या शिवाय सदर 'वास्तुशास्त्र पेंटींग कांही जप व मंत्र यांचे उच्चारण,तज्ज्ञ व्यक्ती कडून केले जाते. अशा सर्व संस्कारांतून निर्माण होणारे पेंटींग हे सकारात्मक वातावरण निर्माण करते.पेंटींग जेव्हा त्या वास्तुत स्थिरावते, तेव्हा तेथील वातावरणही सकारात्मक बनवते. मग मिळणाऱ्या परिणामांचा सकारात्मक अनुभव हा,ते ज्या वास्तूत लावलेले असते त्यांनाच येतो. गोड पदार्थ खाणाऱ्यालाच त्याची गोडी समजते ना...!!.

क्रमशः.....

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान

डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238



# जात्यावरच्या ओव्या......


नाकातली नथ
आड दांडा मोडली
आडाच्या पाण्याला
सैर झुंबड उडली ||२०३||

नाकातली नथ
अशी हाले, तशी डुले,
गवळणी बाई
कामीनी भरताराशी बोले ||२०४||

संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# पाया...

## ( माझ्या रंगसोहळा या पुस्तकातून )





ज्योतिर्मय साहित्य

पाया हा दोन अक्षरांचा शब्द..! पण अर्थ केवढा व्यापक ! कुठलीही गोष्ट उभी करायची असेल तर, पहिल्यांदा पायाचा विचार करावा लागतो. पाय शब्दापासूनच पाया शब्द आला असावा. आपणही पायावरच उभे असतो. जोपर्यंत पाय भक्कम असतात, तोपर्यंत आधार लागत नाही. पण पाय नाजूक असतात तेव्हा लहानपणी पांगुळगाडी आणि पाय थरथरू लागतात तेव्हा, म्हातारपणी काठीची किंवा आधाराची गरज भासते. एखादी इमारत बांधायच्या आधी इंजिनिअर तिच्या पायाचा विचार करतो. इमारत जेवढी मोठी, तेवढा पाया मजबूत आणि खोल घ्यावा लागतो. ज्या इमारतींचा पाया कच्चा असतो, भुसभुशीत असतो, त्या थोड्याशा आघातानेही डळमळतात. भूकंपासारखा मोठा आघात झाला तर पत्त्याच्या बंगल्यासारख्या कोसळतात. म्हणून भविष्यकाळात टिकणारी मजबूत इमारत बांधायची असेल तर, तिचा पाया भक्कमच असायला हवा.



हे सगळे आठवण्याचे कारण म्हणजे सध्या सुरु असलेली विष्णू पुराण ही मालिका. त्यातील एक प्रसंग मनात घर करून गेला. धार्मिक मालिका कोणाला आवडो वा ना आवडो, मी मात्र आवडीने बघतो. त्याची दोन कारणे . एक म्हणजे या मालिकांची निर्मिती करताना त्या दिग्दर्शकाने बऱ्याच ग्रंथांचा अभ्यास करून ती तयार केलेली असते. रामायण, महाभारत, श्रीकृष्ण कोणतीही मालिका घ्या. त्यात सुरुवातीला किंवा शेवटी ती कोणत्या ग्रंथांवर आधारित आहे, ते दिलेले असते. ते बघूनही आपल्याला लेखकाने, दिग्दर्शकाने घेतलेले श्रम सहज लक्षात येतात. आपल्याला एवढे ग्रंथ वाचणे शक्य होईलच असे नाही. दुसरे कारण या मालिकांमधून प्राचीन काळातील लोकांची जीवनशैली, पेहेराव, वागण्याबोलण्याची पद्धत इ गोष्टी कळतात. लहान मुलांना तर या संस्कारक्षम मालिका अवश्य दाखवायला हव्यात. मूल्यशिक्षणाचे ते एक सहज सोपे साधन आहे.

थोडे विषयांतर झाले. मी पुन्हा मूळ विषयाकडे येतो. तर विष्णू पुराण मालिकेत एक प्रसंग आहे. भक्त प्रल्हादाची आई कयाधू आणि प्रल्हाद यांच्यातील हा संवाद आहे. हा प्रसंग सांगण्याआधी मी थोडी पार्श्वभूमी स्पष्ट करतो. असुर सम्राट हिरण्यकश्यपू हा राजा ब्रह्मदेवाकडून मिळालेल्या वरदानामुळे अवध्य आणि अजेय झालेला असतो. भगवान विष्णूने त्याच्या भावाला मारले म्हणून तो विष्णूचा अत्यंत द्वेष करणारा असतो. त्याच्या राज्यात जो कोणी विष्णूचे नाव घेईल, त्यालाही तो प्राणदंडाची शिक्षा देतो आणि स्वतःला भगवान म्हणून घोषित करतो. पण त्याचे दुर्दैव म्हणजे त्याला जो मुलगा होतो, तो विष्णूचा परमभक्त असतो. त्याचे नाव प्रल्हाद. हा प्रल्हाद विष्णूचा परमभक्त होतो त्याचे कारण म्हणजे त्याची आई कयाधू ही तिला दिवस असताना, महर्षी नारदांच्या आश्रमात राहते. त्या परम पवित्र वातावरणाचे आणि महर्षी नारदांच्या शिकवणुकीचे अत्यंत चांगले संस्कार प्रल्हादावर तो गर्भात असताना आणि जन्मल्यानंतर काही काळ तो लहान असताना त्याच्यावर होतात. त्या संस्कारांचा परिणाम दूरगामी होतो. **(क्रमशः)**






उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# बहुधाज्ञान निरूपण

ज्योतिर्मय साहित्य

संताच्या विचारांचा अभ्यास केला तर माणसाच्या अवस्था फक्त दोन, एक ज्ञानाची व दुसरी अज्ञानाची. त्याच प्रमाणे बुद्धीच्या अवस्था पण दोन आहेत. एक आत्मबुद्धीची व दुसरी देहबुद्धीची होय.


देहबुद्धीच्या क्रियेत बुद्धीचे तोंड करून इंद्रियाकडे तर इंद्रियाचे तोंड बाहेरच्या पदार्थाकडे असते. आत्मबुद्धीच्या क्रियेत इंद्रियांचे तोंड बुद्धी कडे आणि बुद्धी चे तोंड आत्म्याकडे असते. जसजसा बुद्धीचा विकास होत जातो, त्याचवेळी विज्ञान, कला व ज्ञान यांचीपण वाढ होते. यावर सविस्तर विवेचन मी मागच्या समासात केले आहे. आता परत ऊजळणी करत नाही.

आत्मबुद्धीचा उपयोग केल्याने अज्ञान कमीकमी होत जाऊन अखेर आत्मज्ञान होते. ते कसे याचे सविस्तर वर्णन या समासात होणार आहे. अभ्यासाचा विषय तसा गहन आहे पण आपण तो आनंदाने व सहजसुंदर करण्याचा प्रयत्न जरूर करणार आहोत.

मानवी मन चंचल आहे, ते एका जागी शांपणे बसत नाही. देहबुद्धीच्या ज्ञानव्यवहारात ज्ञाता कसा आहे हे कळत नाही. त्यासाठी देहबुद्धी, मानवी मनाची अवस्था कल्पनेच्या पलीकडे आहे. खरं तर अनेक विचारवंतांनी ज्ञानाची कक्षा, देह, ज्ञानाची कक्षा, मानवी मनाची स्थित्यतरे यावर अनेक प्रबंध लिहिले आहेत. आपले आयुष्य त्याच्या अभ्यासासाठी खर्च केले आहे. पण आपण संतांच्या विचारात शुद्धज्ञान कसे आहे, ते कसे मिळवावे हे अधिक सोप्या पद्धतीने अभ्यासणार आहोत. आत्मबुद्धीच्या ज्ञानव्यवहारात ज्ञाता ज्ञेयाशी एकरूप होऊन अभिन्नतेने ज्ञेयाचे स्वरूप जाणतो. ज्ञाता (ज्ञानघेणारा) ज्ञान मिळवण्यासाठी ते वाढविण्यासाठी समोरच्याला शहाणे करण्यासाठी प्रचंड मेहनत घेत असतो.

**(क्रमशः)**

# खरी तळमळ लागली म्हणजे संत भेटतो



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

असंताची आवड नाहीशी होईल तेव्हाच संत हवासा वाटेल. विषय आपल्याला त्रास देतात, पण ते सोडावे कसे हे समजत नाही. जंगलात सापडलेल्या माणसाप्रमाणे आपले झाले आहे. आपली वाट चुकली आहे असे ज्याला वाटेल तोच जंगलातून बाहेर पडण्याची वाट विचारतो. 'आता वय फार झाले, काळाच्या स्वाधीन होण्याची वेळ आली, रामा तूच आता तार,' अशी तळमळ लागली, तरच संतसहवास लाभेल. सत्संगत हवी असे आपण म्हणतो खरे, पण मागतो मात्र 'असत'; मग आपल्याला सत्संगत कशी मिळेल ? स्वत:ला कसे विसरावे हे कळण्याकरताच संताला शरण जावे. आपले विस्मरण म्हणजे भगवंताचे स्मरण. वडील दूर आहेत, त्यांचे पत्र नाही, म्हणून काळजी करतो; पण जन्मापासून भगवंत दूर आहे, त्याची तळमळ का लागू नये ? आपण नामस्मरण करतो, पण ज्याचे नाम घेतो तो कोण, असा विचार करतो का? विषय सोडल्याशिवाय राम कसा भेटणार ? रामही हवा आणि विषयही हवा, हे जुळणार कसे ?

मला जोपर्यंत चिमटा घेतलेला कळतो तोपर्यंत कर्ममार्गानेच जाणे जरूर आहे. कर्ममार्ग सांभाळताना, 'कर्ता मी नव्हे' ही भावना सांभाळणे जरूर आहे. जो खरा अनुभवी आहे तो बोलणारच नाही, आणि बोललाच तर तो अगदी थोडे बोलेल; तो उत्तम होय. अनुभवी खरा, पण नाइलाज म्हणून जो बोलतो तो त्याच्यापेक्षा थोडा कमी समजावा. कोणीतरी बोलल्याशिवाय लोकांना कळणार कसे, म्हणून हे लोक कमीपणा पत्करूनही पुष्कळ बोलतात. परंतु अनुभव नसताना उगीच शब्दपांडित्य करणारे हे अगदी खालच्या दर्जाचे होत. ज्याला अनुभव कमी त्याला शब्दपांडित्य फार असते. जो जगाला फसविणार नाही आणि स्वत:ही फसणार नाही, असाच मनुष्य जगाला मार्गाला लावू शकेल.

कित्येक साधू दगड मारतात किंवा शिव्या देतात, तरी लोक त्यांच्या मागे लागतात, कारण त्यांच्या शिव्यादेखील आशीर्वादाप्रमाणे असतात. हे कित्येक लोकांच्या ध्यानी येत नाही. एखादा मुलगा बापाला म्हणू लागला की, 'मी इतका जवळचा, पण मला मिळतो मार; आणि तो लांबचा पोर, त्याचे मात्र लाड !' पण तो मारच आपल्या हितासाठी असतो, हे त्याला नाही समजत ! साधूच्या बोलण्यामध्ये किंवा मारण्यामध्येसुद्धा दुष्ट बुद्धी नसते. संत जे काही बोलतील ते जगाच्या कल्याणाकरताच असते. संत नि:स्वार्थी असतात. ते तळमळीने सांगतात. त्यावर आपण श्रद्धा ठेवली पाहिजे. संताच्या सांगण्याचा खरा अर्थ आचरणानेच कळेल.

संतांच्या संगतीत आपण गेलो की आपले कर्तृत्व संपले.

# ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## जगद्गुरु संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांचा अभंग (भाग दोन)

ज्योतिर्मय साहित्य

मन करा रे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण
मोक्ष अथवा बंधन सुख समाधान इच्छिते
मने प्रतिमा स्थापिली मने मना पूजा केली
मने इच्छा पुरविली मन माऊली सर्वांची
मन गुरु आणि शिष्य करी आपलेच दास्य
प्रसन्न आप आपणास गती अथवा अधोगती साधक वाचक पंडित श्रोते वक्ते ऐका मात नाही नाही आन दैवत तुका म्हणे दुसरे

या महान अभंगाच्या निरूपणात आपण अखिल मानव जमात कोणत्या पाच प्रकारात मनोवृत्तीनुसार विभागली गेली आहे हे पाहिले. मागील भागात आपण या अभंगाचा सुरुवातीचा भाग पाहिला. त्यात हेही पाहिले की, मनात तणाव, चिंता, टेन्शन असेल तर मन प्रसन्न राहू शकत नाही. आता आपण आपल्या मनावरील तणावाचा शरीरावर सुद्धा काय परिणाम होतो हेही पाहू

तणावाचा परिणाम :

माणसाच्या मनावर ताण आला तर त्याचा परिणाम शरीरा वरही होत असतो. तणावग्रस्त माणसाला खूप थकवा जाणवतो. मोठे ओझे घेऊन वागल्या सारखे त्यांचा व्यवहार असतो. तणावाचा परिणाम दोन प्रकारात असतो. एक छातीचे ठोके जलद पडतात, दोन रक्तदाब कमी होतो. काही बाबतीत प्रतिकारशक्ती एकवटल्या जाते. सहन करण्याची क्षमता वाढते. पण हळूहळू ही शक्ती ओसरते. असे व्यक्ती उठतात पुन्हा पडतात. त्यांना अनेक रोग सुद्धा उद्भवतात. मज्जातंतू व रक्त यांच्यातील स्त्रावात तणावाचा मुकाबला करण्याची क्षमता असते. मज्जातंतू दोन प्रकारची असतात. आणि . या इंद्रियावर नियंत्रण ठेवतात. सिंपथेटिक मज्जा तंतू इंद्रियावर नियंत्रण करतात या मज्जातंतूत स्त्राव स्त्रवतात त्यांना एडर लाईट म्हणतात या स्तरावर तणावाचा मुकाबला करता येतो. मानसिक तणावाच्या काळात पिच्युटरी ग्रंथी व एडर्लीन ग्रंथी नियंत्रण ठेवतात. बाह्य परिस्थितीची माहिती मोठ्या मेंदूकडे जाते तेथून ती पिच्युटरी ग्रंथी कडे जाते व तेथून स्त्राव निर्माण होतो. मेंदू ज्ञानतंतू मंडलास आदेश मिळतो व प्रथम शरीरावर नियंत्रणाचा प्रयत्न होतो.

माणसाच्या मनावर कोणती घटना घडली की किती ताण येतो याचीही मोजमाप केल्या गेले आहे डॉक्टर थॉमस या वॉशिंग्टन मधील शास्त्रज्ञाने कोणत्या कामाला किती ताण येतो याचे एकक ठरविले आहे..

ते खालील प्रमाणे आहे.

घटना. ताण
१ पती-पत्नीचा मृत्यू झाला. १०० गुण
२ घटस्फोट. ७३
३ साथिदारापासुन अलग ६५ गुण
४ तुरुंगात स्थानबद्ध. ६३
५ नातेवाइकांचा मृत्यू ६३
६ व्यक्तिगत आजार ५३
७ विवाह. ५०
८ नोकरिसाठी प्रयत्न ४७
९ वैवाहिक जीवनात भांडणे. ४५
१० नोकरीतून निवृत्ती ४५
११ घरातील व्यक्तिच्या सवयीत बदल. ४४
१२ गरोदरपण. ४०
१३ लैंगिक समस्या. ३९
१४ नवागताचे आ ३९ **(क्रमशः)**

# ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

२३. श्रद्धा
भक्ती देण्या माझ्या समोरी अंबामाय आली हो।
रूप निर्गुणाचे त्यागोनी माय सगुण झाली हो।।
जन्मांतरीचे भाग्य माझे ऐसे फळा आले हो।
आज माझ्या स्वप्नी आराध्य प्रकटले हो।।
रूप तिचे पाहता संदेह काही नुरले हो।
प्रेमे तिने पाहता नयनी पाणी आले हो।।
चरण घट्ट धरण्याचे हट्ट माझे पुरले हो।
बिकट संकटाचे घाट सारे सरले हो।।
तिजसी सर्व अर्पूनी मन शांत झाले हो।
गुरुकृपे चंद्रहास भक्तीवाट चाले हो।।
परतीचे मार्ग सारे आता बंद केले हो।
आत म्या येवोनी कडीकोंडे लावले हो।।
२४. विनवणी
आई तुझ्या दारी आलो। न करी उदास।
पायी तुझ्या देई जागा। करीन आरास।
तुझ्याविण नाही त्राता। लावलीसे आस।
विश्वात्मिके पाही मला। म्हणे चंद्रहास।।




# किती पाणी प्यायला हवं?

ज्योतिर्मय साहित्य

आपल्या शरीर ७०% पाण्याचे बनलेले आहे. शरीरातील बहुतांश क्रियांसाठी पाण्याची गरज असते. पेशींपर्यंत पोषक घटक पोहोचवणे, अनावश्य पदार्थ बाहेर टाकणे, जेवण पचवणे अशा क्रियांसाठी पाणी लागते.

शरीरात पाणी कमी झाले, तर डिहायड्रेशन, गोंधळ आणि चक्कर येण्यासारख्या समस्या येऊ शकतात. त्यामुळे पुरेशा प्रमाणात पाणी प्यायलाच हवे. शरीराला किती पाणी हवे, हे अनेक गोष्टींवर अवलंबून असते. यात वजन, शरीराचा आकार, तापमान, शारीरिक हालचाली आदी.

संशोधनानुसार, एका व्यक्तीने दिवसभरात ८ ग्लास पाणी प्यायला हवे. पुरुषांनी ३ लिटर पाणी प्यायला हवे. महिलांनी दिवसभरात २ लिटर पाणी प्यायला हवे आणि मुलांनी दिवसभरात ६ ते ८ कप पाणी प्यायला हवे.

गर्भवती महिलांनी दिवसभरात १० ते १२ ग्लास पाणी प्यायला हवे.

तुम्ही जर शारीरिक हालचाली जास्त करत असाल आणि उष्ण वातावरणात राहत असाल, तर तुम्ही जास्त पाणी प्यायला हवे. किडनी किंवा हृदयांचा आजार असेल, तुम्ही डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार पाणी प्यायला हवे.



तुमच्या तोंड आणि घसा लवकर कोरडा पडत असेल किंवा लघवीचा रंग पिवळा दिसत असेल, तर तुमचे शरीर डिहायड्रेड झाले आहे.

शरीराच्या सर्व भागांना कार्यरत ठेवण्यासाठी तुम्ही दररोज सकाळी उठल्यानंतर लगेच २ ग्लास पाणी प्यायला हवे. पचनक्रिया सुधारण्यासाठी जेवणाआधी अर्धा तास आधी १ ग्लास पाणी प्या.

साधारण २० किलो वजनासाठी १ लिटर पाणी पिणे गरजेचे असते.

पाणी पिण्याची योग्य पद्धत -

१) जेवणाआधी लगेच, जेवतांना व जेवणानंतर लगेच पाणी पिऊ नये.

२) जेवणाच्या अर्धा तास आधी व जेवणानंतर एका तासांनी पाणी प्यावे.

३) एकावेळी एकच ग्लास अशा प्रकारे दर तासा-तासाला एक-एक ग्लास असे तीन ते चार लिटर पाणी दररोज प्यावे. कमीही नको व अशीही नको.

४) पाणी उभे राहून पिऊ नये, बसून व सिप-सिप करुन पाणी प्यावे. पाण्यासोबत लाळ जास्तीत जास्त जाणे आवश्यक.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

# ॥ श्री राम कथा ॥





वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

सुग्रीवाशी रामाने मैत्री केली.आपण परस्पराला मदत करू असा प्रस्ताव त्याने ठेवला. एकट्या सुग्रीवाची वाली युद्ध करण्याची हिम्मत होत नव्हती वालीला एक वर मिळाला होता की त्याच्याशी जो समोरून युद्ध करील त्यापेक्षा याची शक्ती दुपटीने वाढेल. या वरामुळे शुग्रिवास समोरासमोर वालीही युद्ध करता येत नव्हते प्रभू राम आणि त्यास मदतीचे आश्वासन दिले. दोघात पुन्हा एकदा युद्ध सुरू झाले.पण पहिल्या युद्धात वाली कोण व सुग्रीव कोण हे कळेना म्हणून रामांना निर्णय करता येईना. कारण दोघेही एकसारखे दिसत होते.मग दुसऱ्या वेळेस सुग्रीवाच्या गळ्यात हार घातला व आडून रामाने वालीला मारले.

कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886


वाली हा महापराक्रमी आणि बलशाली राजा होता.एकदा वालीने रावणास हरविले होते व स्वतः चे गोठ्यात बांधून ठेवले होते.वाली पुत्र अंगद जेव्हा तान्हा होता तेंव्हा त्याच्या पाळण्यावर चांदवा म्हणून रावणास बांधून टाकले होते. अंगद शिशू होता तो रावणास लाथ मारीत असे.

वालीच्या मृत्यूनंतर तारा विलाप करायला लागले तिच्या हे लक्षात आले की वालीचा वध हा रामाने केला आहे म्हणून ती प्रभुरामचंद्रास म्हणाली. तारा म्हणे तुम्ही माझ्या नवऱ्यास मारले ते ठीक असेल पण मला वैधव्याचे दुःख का दिले.हा तर्क रामास पटला.त्यांना असे वाटले हिचे बोलणे तार्किक आहे.तर्काची निवृत्ती तर्काने केली तर त्या तर्का पेक्षा अधिक प्रबळ तर्क मांडणारा पुढे येतो.पण तर्काला नेहमी तत्वाने उत्तर द्यावे.

**(क्रमशः)**




# अष्टपैलू आचार्य अत्रे



ज्योतिर्मय 📖 साहित्य

१३ ऑगस्ट ही आचार्य अत्रे यांची जयंती. प्रल्हाद केशव अत्रे ऊर्फ आचार्य अत्रे हे मराठीतील नामवंत लेखक, कवी, नाटककार, संपादक, चित्रपट निर्माते, शिक्षणतज्ज्ञ, राजकारणी व वक्ते होते. त्यांनी केशवकुमार या टोपण नावाने ''झेंडूची फुले'' हे विडंबनपर काव्य लिहिले. ''झेंडूची फुले या विडंबनपर काव्यामुळे विडंबनाला मराठी वाङ्मयात स्वतंत्र स्थान मिळाले.

आचार्य अत्रे महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी उभ्या राहिलेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील प्रमुख नेते होते. त्यांनी आपल्या प्रभावी वक्तृत्वाने महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनात मोलाची भर घातली. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी केलेले कार्य अविस्मरणीय आहे. १९५७ मध्ये ते महाराष्ट्र एकीकरण समितीच्या तिकिटावर विधानसभेत निवडून आले आणि विधिमंडळात प्रभावीपणे आपले विचार मांडले. आचार्य अत्र्यांच्या घणाघाती भाषणांमुळेच संयुक्त महाराष्ट्र मिळाला असे मानले जाते. .

आचार्य अत्रे यांचा जन्म १३ ऑगस्ट, १८९८ रोजी पुणे जिल्ह्यातील सासवड जवळील कोडित खुर्द या गावी झाला. सासवडच्या एमईएस वाघिरे हायस्कूलमधून त्यांनी प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. १९१९ मध्ये फर्ग्युसन महाविद्यालयातून त्यांनी मॅट्रिक पूर्ण केले. पुणे विद्यापीठातून त्यांनी कला शाखेची पदवी पूर्ण केली. पदवीनंतर अत्रे यांनी शाळेत शिक्षक म्हणून काम केले. अत्रे यांनी १९२८ मध्ये लंडन विद्यापीठातून टी.डी. ही शिक्षणविषयक पदविका प्राप्त केली. लंडनहून भारतात परत येण्यापूर्वी त्यांनी लंडन येथे प्रायोगिक मानसशास्त्राचा अभ्यास केला.

आचार्य अत्रे यांनी काही काळ अध्यापनाचे कार्यसुद्धा केले. मुंबईत पहिले सहा महिने सँढर्स्ट हायस्कूलमध्ये इंग्रजी व गणित शिकवले, व नंतर रॉबर्ट मनी स्कूलमध्ये एक महिना वर्गशिक्षक व त्यानंतर फोर्टमधल्या न्यू स्कूल (भरडा न्यू हायस्कूल) मध्ये संस्कृत शिक्षक म्हणून त्यांनी नोकरी केली. पुण्याला कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत १८ वर्षे मुख्याध्यापक म्हणून लौकिक मिळवला व त्या शाळेचा मोठा विस्तार केला. ती शाळा म्हणजे अत्रे यांच्या नाट्यलेखनाची आणि समाजसेवेची जणू प्रयोगशाळाच होती. जातिभेदाच्या भिंती फोडण्याचा मंत्र त्यांना या शाळेतच मिळाला.

पुण्यात राजा धनराज गिरजी व मुलींची आगरकर हायस्कूल यांची स्थापना केली. प्राथमिक शाळेसाठी ''नवयुग वाचनमाला'' व दुय्यम शाळेसाठी ''अरुण वाचनमाला'' ह्या दोन क्रमिक पुस्तकांच्या माला लिहिल्या. १९३७ साली पुणे नगरपालिकेत निवडून आल्यानंतर शिक्षकांसाठी गांधी ट्रेनिंग कॉलेज काढले.


आचार्य अत्रे आणि गिरीश दोघेही हाडाचे द्रष्टे शिक्षक होते. त्यावेळी ते अनुक्रमे कॅम्प एज्युकेशन सोसायटीचे हायस्कूल आणि न्यू इंग्लिश स्कूल, पुणे येथे मराठीचे अध्यापक होते. अत्रे तर लंडनहून शिक्षणशास्त्रातील उच्च पदविका घेऊन परतले होते; आणि शाळेचे मुख्याध्यापक होते. तेव्हा अशा जाणकारांच्या अनुभवातून ही पुस्तके तयार झाली आणि एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे अवघ्या शिक्षणक्षेत्राला दिशादर्शकाचे काम करू लागली. पुस्तकांच्या प्रस्तावनेत उल्लेख केल्याप्रमाणे ही पुस्तके आधुनिक भाषा-शिक्षणाची व अध्यापनशास्त्राची तत्त्वे लक्षात घेऊन तयार केली होती. पुस्तकांची रचना करताना कला आणि वाङ्मय हा मुख्य दृष्टिकोन ठेवला होता


इ.स. १९२३ साली अत्रे यांनी अध्यापन मासिक सुरू केले. त्यानंतरही त्यांनी रत्नाकर मनोरमा, इत्यादी नियतकालिके काढली. जानेवारी १९४० मध्ये त्यांनी नवयुग साप्ताहिक सुरू केले, ज्याने मराठी पत्रकारितेत एक वेगळा ठसा उमटवला. .

१५ नोव्हेंबर १९५६ रोजी त्यांनी मराठा हे दैनिक सुरू केले. मराठामधील त्यांनी रोखठोक आणि निर्भीड भाषेत लिहिलेले अग्रलेख खूप प्रसिद्ध झाले. मराठा हे दैनिक त्यांच्या हयातीनंतरही काही काळ प्रकाशित होत होते. आचार्य अत्रे यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मरणार्थ त्यांचे नाव असलेल्या अनेक संस्था मुंबई, ठाणे, पुरंदर पिंपरी, सासवड इत्यादी ठिकाणी स्थापन झाल्या. आचार्य अत्रे यांनी चित्रपटसृष्टीतही आपले वेगळे स्थान निर्माण केले. अनेक चित्रपटांच्या पटकथा त्यांनी लिहून दिल्या. नारद-नारदी, धर्मवीर, प्रेमवीर, ब्रह्मचारी यातील काही चित्रपटांच्या कथा तर काही चित्रपटांच्या पटकथा आणि संवाद त्यांनी लिहून दिले. त्यांनी लिहिलेला ब्रँडीची बाटली हा चित्रपट खूप लोकप्रिय ठरला. आचार्य अत्रे यांनी राजगुरू व अभ्यंकर या इतर दोन भागीदारांसोबत एआरए या नावाने नवयुग चित्रपट कंपनी काढली. पुढे हंस पिक्चर्स मधले मास्टर विनायक, पांडुरंग नाईक, बाबूराव पेंढारकर हेदेखील भागीदार झाल्यावर या कंपनीने 'नवयुग पिक्चर्स' असे नाव बदलून घेतले. इ.स. १९४० साली नवयुग पिक्चर्सतर्फे लपंडाव चित्रपटाची कथा अत्रे यांनी लिहिली. लपंडाव चित्रपटानंतर त्यांनी संत सखू या चित्रपटाचे संवाद लिहिले. परंतु पुढे काही वाद झाल्यामुळे आचार्य अत्रे यांनी नवयुग पिक्चर्स सोडले. १९४२ साली अत्रे पिक्चर्सची निर्मिती असलेला वसंतसेना हा चित्रपट मराठी व हिंदी भाषेतील आवृत्त्यांमध्ये प्रदर्शित झाला. या चित्रपटाची निर्मिती, कथा, पटकथा, संवाद व गीते अत्रे यांची होती. गजानन जहागीरदार हे या चित्रपटाचे दिग्दर्शक होते, तर संगीतकार होते मास्टर कृष्णराव.


उद्धव भयवाळ
१९, शांतीनाथ हाऊसिंग सोसायटी,
गादिया विहार रोड, शहानूरवाडी
छत्रपती संभाजीनगर मो.८८८८९२५४८८

आचार्य अत्रे यांनी दिग्दर्शित केलेल्या ''श्यामची आई'' चित्रपटाला १९५४ साली सुरू झालेल्या ''राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार'' सोहळ्यात सर्वोत्कृष्ट चित्रपटाचे पहिले ''सुवर्ण कमळ'' मिळाले होते. जून १९२४ साली मुंबईच्या सरकारी ट्रेनिंग कॉलेजमध्ये शिक्षणशास्त्राचे प्रशिक्षण घेऊन बी. टी. परीक्षेत वर्गात प्रथम आले व त्यानंतर १९२७ ते १९२८ सालच्या दरम्यान इंग्लंडला टीचर्स डिप्लोमा मिळवला. त्यांच्या काही निष्ठा पक्क्या होत्या. उदाहरणार्थ, सामाजिक बांधिलकी. समाजातील दुर्बल घटक, गोरगरीब, तळागाळातील माणसे, अज्ञजन, उपेक्षित, दलित यांचा आपल्या सामर्थ्यानिशी अत्र्यांनी सतत कैवार घेतला. आचार्य अत्रे हे उत्तम नाटककार होते. त्यांनी पंचवीसपेक्षा जास्त एकाहून एक सरस नाटकांचे लेखन केले. त्यांची डॉ.लागू, बुवा तेथे बाया, लग्नाची बेडी, पाणिग्रहण, प्रीतिसंगम, तो मी नव्हेच, मोरूची मावशी ही आणि इतर काही नाटके खूप गाजली. नाटक, कथा, काव्य. कादंबरी, लेख असे चौफेर लेखन त्यांनी केले. कऱ्हेचे पाणी हे त्यांचे पाच खंडातील आत्मचरित्र त्यावेळी खूप गाजले होते. विष्णूदास भावे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सांगलीची अखिल भारतीय नाट्य विद्यामंदिर समिती ही इसवी सनाच्या १९६० सालापासून विष्णूदास भावे पुरस्कार देत आली आहे. आचार्य अत्रे यांना हा पुरस्कार मिळाला आहे. आज महाराष्ट्रातील अनेक संस्था त्यांच्या नावाने पुरस्कार देतात. अशोक हांडे यांची संकल्पना, लेखन व दिग्दर्शन असलेला 'अत्रे-अत्रे-सर्वत्रे' हा अत्रे यांची संगीतमय जीवनकथा सांगणारा कार्यक्रम आहे. 'मी अत्रे बोलतोय' हा एकपात्री कार्यक्रम करणारे अनेकजण आहेत. सदानंद जोशी हे त्यांपैकी एक प्रमुख होत. दरवर्षी आचार्य अत्र्यांच्या जन्मदिनी म्हणजे १३ ऑगस्ट रोजी सासवड येथे आचार्य अत्रे साहित्य संमेलन भरते. अनेक कार्यक्रमांसोबत त्या संमेलनात आचार्य अत्रे यांच्या नावाने काही पुरस्कार दिले जातात. आचार्य अत्रे यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन.





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय 📖 साहित्य

# गुरुदेवांची स्वतंत्र राजकीय विचारसरणी

भारतातील जनतेच्या वस्तुस्थितीची कल्पना गुरुदेवांना आली होती. आणि त्यानुसार त्यांनी त्यांच्या परीने ग्रामीण भागातील परिस्थिती सुधारण्यासाठीची सुरुवातही केली होती. त्यांनी शेतकऱ्यांचे सहकारी संघ, पतसंस्था सुरू केल्या. ते स्वदेशीचे पुरस्कर्ते होते. ते त्याबद्दल फक्त बोलूनच थांबले नाहीत तर बलेंद्रनाथ या आपल्या पुतण्याला त्यांनी कलकत्ता येथे व स्वदेशी वस्तू भांडार काढून चालवायला दिले. जोपर्यंत पुढील विधायक कार्यक्रम दृष्टीपथात येत नाही तोपर्यंत तरुणांनी शाळा कॉलेजांवर बहिष्कार टाकू नये असे त्यांना वाटत होते. तरुणांची विचारसरणी स्वतंत्र असावी, त्यांनी स्वयंप्रज्ञेने निर्णय घ्यावेत असे त्यांना वाटत होते. भावनेच्या आहारी जाऊन बरेच तरुण सत्याग्रहाच्या, असहकाराच्या चळवळीत सामील झाले होते. केवळ भावनेच्या आहारी जाऊन असे निर्णय जेव्हा घेतले जातात तेव्हा बऱ्याच वेळा विधायक कार्याच्या ऐवजी विघातक कार्ये तरुणांकडून घडतात असे त्यांना वाटत होते आणि ते बरोबरही होते.

गुरुदेवांच्या या प्रामाणिक प्रयत्नांचे महत्त्व लोकमान्य टिळकांनी ओळखले होते. भारतीय संस्कृतीची उज्वल परंपरा जगामध्ये नेण्याचे कार्य गुरुदेवांच्या हातून घडत होते. त्यांच्या या कार्याचा गौरव करणारे पत्र लोकमान्य टिळकांनी त्यांना पाठवले होते. गुरुदेवांनाही लोकमान्यांच्या कार्याबद्दल आदर होता. गुरुदेवांच्या मनात राष्ट्रोद्धाराचे असलेले विचार स्पष्ट होते. वंगभंग चळवळीच्या साहित्य परिषदेच्या व्यासपीठावरून त्यांनी याबाबतचे आपले विचार मांडले होते. गाव पातळीवर पाच कार्यकर्ते निवडून आपल्या गावाचा कारभार आपणच करावा अशा प्रकारचे आवाहन त्यांनी केले. विध्वंसक वृत्तीने न वागता विधायक वृत्तीने देश समर्थ करावा असे त्यांचे मत होते. गुरुदेवांची ही राजकीय विचारसरणी त्या काळातील बरेच लोकांच्या पचनी पडणारी नसली तरी त्यांनी निष्ठेने आपले कार्य सुरूच ठेवले होते. राष्ट्रवादी राष्ट्राचे हित आणि राष्ट्राचा स्वार्थ या दोन वेगळ्या गोष्टी आहेत असे त्यांचे मत होते राष्ट्र कारण आणि विश्व करण या दोन गोष्टी वेगळ्या असू शकत नाहीत त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत आणि एकमेकांना पूरक आहेत असे त्यांना वाटत होते. हीच भावना त्यांच्या प्रत्येक कृती आणि उक्ती मागे होती. आपला राष्ट्राभिमान जर विश्वकल्याणाच्या आड येत असेल तर तो हित करण्याऐवजी मानवजातीचे नुकसानच करतो. म्हणूनच स्वातंत्र्यसंग्रामात सक्रिय भाग न घेता साहित्य आणि शिक्षण ही दोन कार्यक्षेत्रे त्यांनी निवडली आणि आयुष्यभर त्या माध्यमातून कार्य केले. आपल्या विचारांशी ते प्रामाणिक राहिले. त्यांच्या कार्याची आणि विचारांची दिशा यत्र विश्वम भवत्येक निडम विश्वभारतीकडे वाटचाल करणारी होती. ज्ञानदेवांच्या पसायदानातील उदात्तताच त्यांच्या विचारात भरून राहिली होती. हे विश्वचि माझे घर, अवघे जग एक कुटुंब व्हावे अशी त्यांचे मनोमन इच्छा होती.



## मदर फाऊंड्रेस डे निमित्त ९० रक्त दात्यांनी केले रक्तदान

ज्योतिर्मय 📖 साहित्य

**छत्रपती संभाजीनगर** – मदर फाऊंड्रेस डे आणि भारताचा स्वातंत्र्य दिन हे औचित्य साधून, सामाजिक भान राखत

दिनांक ९ ऑगस्ट रोजी होली क्रॉस इंग्लिश हायस्कूल, छावणी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ह्यात शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी, जागरूक नागरिक अशा एकूण ९० रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेचे कार्य केले. रक्तदानानंतर रक्त दात्यांना प्रमाणपत्र आणि अल्पोपहार देण्यात आला. दरवर्षी हा उपक्रम शाळा न चुकता घेत असते.

रक्तदानाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका सिस्टर सिंथिया फर्नांडिस, उपमुख्याध्यापिका सिस्टर जिनी, एनसीसी इन्चार्ज राजेंद्र ब्राह्मणे, काजल ठाकूर, एनसीसी चे कॅडेट्स, घाटी दवाखान्याचे डॉक्टर्स, नर्सेस ह्यांनी विशेष सहकार्य केले.









